# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे

फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट १०४/२०२५ दिनांक - ०४/०३/२०२५

## प्रेस नोट

**०५ लाख रुपये किंमतीचा ९३३ ग्रॅम चरस हा अंमली पदार्थ जप्त करुन ०२ ईसमांना अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश**

**----------------------------------------------**

मिरा-भाईंदर-वसई-विरार परीसरात अंमली पदार्थांची विक्री होवु नये या अनुषंगाने कारवाई करणेबाबत मा. वरीष्ठांनी आदेशित केले होते. त्याप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोलीस पथक वसई विरार परीसरात पेट्रोलिंग करत असताना दिनांक ०३.०३.२०२५ रोजी २०.०५ वाजेचे सुमारास अहमदाबाद मुंबई हायवे रोड मुंबई वाहीनीवर जय अंबे पेट्रोल पंप जवळ, नायगांव पुर्व, ता.वसई जि. पालघर या ठिकाणी एक ईसम एका पिशवीमध्ये संशयीतरित्या सामान घेवुन जाताना दिसुन आला. त्यामुळे सदर ईसम नामे नवीन निरज झा, वय-४५ वर्षे, रा. सव्है क्र.५, पाटील पाडा चिंचोटी, नायगांव पुर्व ता. वसई जि.पालघर यास थांबवुन त्याचेकडे चौकशी करुन कारवाई करता त्याचे ताब्यात ५,००,०००/-रुपये किमतीचे ९३३ ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ मिळुन आला. त्याबाबत नायगाव पो.स्टे.गु.नो.क्र. ८८/२०२५ एन.डी.पी.एस अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २०(ब) प्रमाणे दिनांक ०४/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाई दरम्यान आरोपी नामे नवीन निरज झा याने दिलेल्या माहिती प्रमाणे त्याचा गुन्हयातील साथीदार मुकेशकुमार शंकर साह, वय २८ वर्षे रा. रुम नं १, चाळ नं १०, फेस २, मोर्या नगर, टिटवाळा, ठाणे (मुळ राह- ग्राम सिंघवारी, पो. पहसोल, तहसिल कटरा, जिल्हा मुजफरपुर, राज्य बिहार) यास देखील मध्यवर्ती गुन्हे शाखेने ताब्यात घेवुन पुढील कारवाई करीता नायगाव पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नायगांव पोलीस स्टेशन करीत आहे.

**दोन्ही आरोपींताविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयांची माहिती खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | पोलीस आयुक्तालय | गुन्हा नोद क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | अंमली पदार्थ विरोधी पथक, मुंबई शहर | मुंबई शहर पोलीस आयुक्तालय | गुरनं १८२/२०२२, एन.डी.पी.एस अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २०(क),२९ प्रमाणे |
| २. | अंमली पदार्थ विरोधी पथक,वरळी मुंबई शहर | मुंबई शहर पोलीस आयुक्तालय | गुरनं ७१/२०२१, एन.डी.पी.एस अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २०(क),२९ प्रमाणे |

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे कक्षाचे प्र.पो.निरी/अविराज कुराडे, सपोनिरी/ दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, प्रशांत गांगुर्डे, पुष्पराज सुर्वे, सहापोउपनिरी/श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा/संतोष मदने, शिवाजी पाटील, विजय गायकवाड, रविंद्र भालेराव, गोविंद केंद्रे, प्रविणराज पवार, हनुमंत सुर्यवंशी,धनंजय चौधरी, समीर यादव,विकास राजपुत, संदिप शेरमाळे, रविंद्र कांबळे, पोअं/नितीन राठोड, सफौ.संतोष चव्हाण, मसुब/सचिन चौधरी यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

